| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०५.०९.२०२० |
| नोंदणी दिनांक | ०५.०९.२०२० |
| न्यायनिर्णय दिनांक | ०१.०७.२०२६ |
| कालावधी | ०५व. ०९म. २६दि. |

| | |
|---|---|
| MHAU090019592020 | **पैठण येथील ४थे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी- रा.भा.डोळे)**<br>**(घोषीत दिनांक. ०१.०७.२०२६)**<br>**नियमित फौजदारी खटला क्रं.२९४/२०२०, निशाणी क्रं.८७**<br>**गु.र.नं.१३४/२०२० पोलीस ठाणे बिडकीन, ता.पैठण, जि.औरंगाबाद.** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. ए.एस.बडजाते |
| आरोपी | १. प्रकाश विठ्ठल राठोड<br>वय: ३१ व्यवसाय: शेती<br>२. सचिन विठ्ठल राठोड<br>वय: २१ व्यवसाय: शेती<br>३. कुलदीप ऊर्फ संदेश दिलीप पवार<br>वय: १९ व्यवसाय: शेती<br>४. तुळसाबाई दिलीप पवार<br>वय: ४२ व्यवसाय: शेती<br>१ ते ४ रा. पोरगाव, ता. पैठण<br>५. अल्काबाई चंद्रकांत पवार<br>वय: ३५ व्यवसाय: शेती<br>रा. टेकडी तांडा, ता. पैठण<br>६. विठ्ठल रामलाल राठोड<br>वय: ७० व्यवसाय: शेती<br>७. अनुसयाबाई विठ्ठल राठोड<br>वय: ६५ व्यवसाय: शेती<br>रा. पोरगाव, ता. पैठण, |

| | |
|---|---|
| | जि. छत्रपती संभाजीनगर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री.के.बी. पटेल |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०४.०५.२०२० |
| पहिली खबर दिनांक | ०४.०५.२०२० |
| दोषारोपत्राचा दिनांक | १४.०७.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २४.०६.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २४.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | - |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१.०७.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश विठ्ठल राठोड | दि.१२.०५.२०२० रोजी सीआरपीसी ४१ (अ) १ प्रमाणे नोटीस | | भा.दं.वी. कलम १४३,१४७,१४८,१४९,३२४,३२३,५०४,५०६ | निर्दोष मुक्त केले | - | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | सचिन विठ्ठल राठोड | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३. | कुलदीप ऊर्फ संदेश दिलीप पवार | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४. | तुळसाबाई दिलीप पवार | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ५. | अल्काबाई चंद्रकांत पवार | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ६. | विठ्ठल रामलाल राठोड | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ७. | अनुसयाबाई विठ्ठल राठोड | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

**भाग-क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सा.क्र.१/ नि.क्र.६० | रघुनाथ मानु राठोड | फिर्यादी |
| सा.क्र.२/ नि.क्र.६३ | संजय मानु राठोड | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| **ब.** | **बचाव पक्षातर्फे/आरोपीतर्फे साक्षीदार** | **निरंक** |
| **क.** | **न्यायालयीन साक्षीदार** | **निरंक** |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / न्यायालयीन निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १. | ६१ | फिर्याद वरील सही |
| २. | ६२ | प्रथम छापील खबर वरील सही |

**ब. न्यायालयीन निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | ८० ते ८६ | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन |

**क. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| - | निरंक | - |

**- न्यायनिर्णय -**

(घोषणा दिनांक –०१.०७.२०२६)

आरोपींविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की,

फिर्यादी हे पोरगाव तांडा येथे राहतात. ते शेती करतात. दि.०४.०५.२०२० रोजी दुपारी ०२.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी त्याचे कुटुंबासोबत शेतात असतांना आरोपी तेथे आले व म्हणाले की, आम्हाला शेतातून जाणेसाठी रस्ता का देत नाही ? संजयने त्याच्या हातातील लाकडी दांड्याने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या गुडघ्यावर मारहाण केली. तेव्हा फिर्यादी व त्यांचे कुटुंबिय धाकाने गावाकडे निघाले. गावाकडे जात असतांना गावात जातेवेळी आरोपी प्रकाश याने फिर्यादीने लाकडी दांड्याने

मारले. तेव्हा त्यांचा भाऊ संजय हा भांडण सोडवण्यासाठी आहे. त्यावेळी प्रकाश याने त्याला लाकडी दांड्याने मारले. बबीता, अनिता, मानू यांना चापटबुक्यांने मारहाण केली व शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**०३.** त्या अन्वये गु.क्र.१३४/२०२० हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांची जाबजबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा तयार केला, जप्ती केली. तसेच जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्यांनी तपासाअंती दोषारोपत्र सादर केले.

**०४.** आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याबद्दल आरोप नि.क्र.४७ अन्वये निश्चित केले. सदर आरोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचुन व समजावून सांगितले. आरोपी यांनी नि.क्र.४८ ते ५४ अन्वये गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले व संपरीक्षेची मागणी केली. खोटी केस केली, या आशयाचा बचाव आरोपींनी घेतला, असे त्याचे भारतीय फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेच्या निवेदनावरुन दिसून येते.

**०५.** अभियोग पक्षाची बाजू व आरोप पक्षाचा बचाव लक्षात घेता, मी खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित करुन त्याचा निष्कर्ष कारणमिमांसासह नोंदवित आहे:-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.०४.०५.२०२० रोजी दुपारी ०२.०० वाजेच्या सुमारास मौजे पोरगाव तांडा शेत गट क्र.१८/१ येथे आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून, जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर, त्यात घटक म्हणून समाविष्ट झाले व फिर्यादी व साक्षीदार यांचेवर फौजदारी पात्र बलप्रयोग केला व फिर्यादी यांना शिवीगाळ करुन आणि याद्वारे | **नकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| | आरोपींनी भारतीय दंड विधानचे कलम १४३ सह १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | |
| **२.** | अभियोग पक्ष पुढे असेही सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी, अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर, दंगल घडवून फिर्यादी व साक्षीदार यांना धमक्या दिल्या आणि याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानचे कलम १४७ सह १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **नकारार्थी..** |
| **३.** | अभियोग पक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी, अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर, दंगल घडवून फिर्यादी व साक्षीदारांना काडी या जिवघेण्या हत्याराने गंभीर दुखापत पोहोचविला की ज्यामुळे त्याचा मृत्यू होणे संभवणिय आहे, अशा हत्याराचा वापर केला आणि याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानचे कलम १४८ सह १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **नकारार्थी..** |
| **४.** | अभियोग पक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर फिर्यादीस मारहाण केली आणि याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२३ सह कलम ३४ खाली शिक्षा पात्र असलेला अपराध केला ? | **नकारार्थी..** |
| **५.** | अभियोग पक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर फिर्यादीस लाकडी काठीने मारहाण केली आणि याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२४ सह | **नकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| | कलम १४९ खाली शिक्षा पात्र असलेला अपराध केला | |
| ६. | अभियोग पक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर फिर्यादीस वाईट शिवीगाळ केली, जेणेकरुन त्यांचा क्रोध चढण्यास कारण होवुन तसे साधारण सर्व लोकांचा स्वस्थ पणा मोडील अगर दुसरा एखादा अपराध करील हे माहित असुन त्या इराद्याने फिर्यादी आणि त्यांचे परिवाराचा बुध्दीपूर्वक अपमान केला आणि याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानचे कलम ५०४ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **नकारार्थी..** |
| ७. | अभियोग पक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख वेळी व ठिकाणी, सर्व आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून जमावाच्या समान उद्देशपुर्तीखातर फिर्यादीस जिवे ठार मारण्याची धमकी दिली व फौजदारी धाकदपटशा केला, आणि याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानचे कलम ५०६ सह कलम १४९ खाली शिक्षापात्र असलेला अपराध केला ? | **नकारार्थी..** |
| ८. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ७ करीता</u> -**

**०६.** मुद्दा क्रं.१ ते ७ एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याच्या उद्देशाने मी सर्व मुद्दयाचे एकत्र विवेचन करीत आहे.

**०७.** अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले. अभियोग पक्षाने दोन साक्षीदार तपासले आहे. फिर्यादी यांनी असे कथन केले की, ते आरोपींना ओळखतात.

दि.०४.०५.२०२० रोजी ते त्यांच्या शेतात होते. त्यावेळेस आरोपींसोबत किरकिर झाली होती, असे कथन केले. त्यानंतर ते अभियोगपक्षास फितुर झाले. अभियोग पक्षाने सदरहु साक्षीदाराला फितुर म्हणुन घोषीत केले. त्यानंतर देखील त्यांनी अभियोग पक्षास दाद दिली नाही. त्यांनी त्यांच्या फिर्यादमधील व छापील प्रथम खबर वरील सह्या ओळखल्या. उलटतपासणीमध्ये त्यांनी कबुल केले की, न्यायालयाबाहेर त्यांची व आरोपींची तडजोड झालेली आहे.

**०८.** सा.क्र.२ यांनी असे कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. फिर्यादी त्यांचा भाऊ आहे. दि.०४.०५.२०२० रोजी ते त्यांच्या कुटुंबासोबत शेतात होते, असे कथन केले. ते देखील अभियोग पक्षास फितुर झाले. अभियोग पक्षाने सदरहू साक्षीदाराला फितुर म्हणुन घोषीत केले. त्यानंतर देखील त्यांनी अभियोग पक्षास दाद दिली नाही.

**०९.** अभियोग पक्षाचे पुराव्याचे अवलोकन केले असता, दोन्ही साक्षीदार फितुर झाले. त्यास कारण म्हणजे त्यांची आपसी तडजोड झाली आहे. फिर्यादी यांनी हे कबुल केले आहे की, त्यांचे आपसात मिटले आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या सह्या ओळखल्या. सह्या नि.क्र.६१ व ६२ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. फिर्याद शाबीत झाली नाही. परंतु फिर्यादीचे अवलोकन केले असता यामध्ये बबीता, अनिता व मानू यांना पण चाटबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली असे नमुद आहे. अभियोगपक्षाने सा.क्र.२ संजय यांना तपासले. जखमी मानू हे हयात नाही असे दोघे साक्षीदारांनी कथन केले. बबीता व अनिता यांचे निवेदन/बयाण हे तपासी अधिकारी यांनी नोंदवले नाही. फिर्यादी यांनी असे कथन केले आहे की, त्याच्या पत्नीचे नाव लता ऊर्फ अनिता आहे. अभिलेखावर आरोपी व फिर्यादी यांचा आपसी समझौता परवानगीसाठी अर्ज नि.क्र.५५ अन्वये अभिलेखावर दाखल आहे. त्यावर बबीता, लता, संजय व रघुनाथ यांच्या सह्या आहेत. तसेच नि.क्र.४६ अन्वये लता यांचे शपथपत्र आहे. फिर्यादी व आरोपी यांच्या आपसी समझौता झालेला आहे. जखमींनी न्यायालयात हजर राहुन अर्ज दाखल केला आहे.

**१०.** फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींवरील आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिध्द झाले पाहिजेत, तो पर्यंत आरोपी निर्दोष आहेत हे गृहीतक आहे. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याचा विचार करता, संदिग्ध पुरावा, अभियोगपक्षाने दाखल आहे. सबब, कोणतेही तथ्य अभियोगपक्ष सिध्द करु शकले नाही. आरोपींवरील दोषारोप सिध्द झाले नाहीत, म्हणून, मी मुद्दे क्र.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी देऊन मुद्दा क्र.८ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**मुद्दा क्रं.८ साठी :-**

**११.** मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू केली होती. त्याचा परिणाम जन-जीवनासोबतच न्यायालयीन कामकाजावर देखील झाला. मा. उच्च न्यायालयाने न्यायालयीन कामकाजासाठी वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केले. मा. उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये दिनांक ०२.०८.२०२१ पासून न्यायालयीन कामकाज हे पूर्ववत सुरू झाले.

**१२.** ज्याअर्थी मुद्दा क्रं.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी देण्यात आलेले आहेत, त्यावरुन स्पष्ट झालेले आहे की, अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप संशयापलीकडे सिध्द केलेले नाहीत, त्यामुळे आरोपी निर्दोष होणेस पात्र आहे. करिता, मुद्दा क्रं.८ चे उत्तराचे अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र.१. प्रकाश विठ्ठल राठोड, आरोपी क्र.२. सचिन विठ्ठल राठोड, आरोपी क्र.३. कुलदीप ऊर्फ संदेश दिलीप पवार, आरोपी क्र.४. तुळसाबाई दिलीप पवार, आरोपी क्र.५. अल्काबाई चंद्रकांत पवार, आरोपी क्र.६. विठ्ठल रामलाल राठोड व आरोपी क्र.७. अनुसयाबाई विठ्ठल राठोड यांची भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रू.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रकमेचा मुचलका द्यावा.

४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधीघोषित करण्यात आला.

RAJU BHASKAR DOLE

Digitally signed by RAJU BHASKAR DOLE
Date: 2026.07.01 15:51:14 +0530

(श्री.रा.भा.डोळे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
(न्यायालय क्र.४) पैठण.

दिनांक - ०१.०७.२०२६